४

क्र. का.-६/स्थातअ/सामान्य/२२५५/
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,
पुणे यांचे कार्यालय, पुणे .
दिनांक २३.१२.१९८७.

**परिपत्रक** :-

महालेखापाल यांनी काढलेल्या आक्षेपावरुन असे दृष्टीपत्तीस आले आहे की, शासनाने मुद्रांक शुल्क व नोंदणी फी यांची तूट देण्याबाबत ज्या निरनिराळया अधिसूचना प्रसृत केल्या आहेत. त्यांचा नीट अभ्यास न करता अनेक दस्तऐवजास मुद्रांक शुल्क व नोंदणी फी ची माफी / सुट दुय्यम निबंधकांनी दिली आहे. सदर विषयावर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले आहे की,प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत मागील महिन्यांत ज्या ज्या दस्तऐवजांना मुद्रांक शुल्क व नोंदणी फी ची सूट/ माफी देण्यांत आलेली आहे अशा दस्तऐवजाची यादी प्रत्येक दुय्यम निबंधकाने योग्य आधार दर्शवून माफीचे कारणासह सह जिल्हा निबंधक यांचेकडे पाठवावी.

२/- सह जिल्हा निबंधक यांनी अशा दस्तऐवजांची लवकरांत लवकर पाहणी करावी व मगच असे दस्त छायाचित्र नोंदणी कार्यालयाकडे पाठवावेत. सह जिल्हा निबंधकांनी अशा दस्ताची योग्य तपासणी करुन आवश्यक तेथे मुद्रांक शुल्क व नोंदणी फी यांच्या वसुलीबाबत आदेश घ्यावेत. ज्या दुय्यम निबंधकांचे हातून वारंवार चुकीने माफी/ सूट दिली गेली असेल अशा बाबतीत त्यांची नांवे नोंदणी महानिरीक्षक कार्यालयास कळवावीत.

का. प्र. उपनोंमीन यांचे
सहीची असे.

सही/xxxxx

(शा. भा. फाटक)
कार्यासन अधिकारी क्रं. ६ व सहाय्यक
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,
पुणे.

प्रत :-

१. सर्व सह जिल्हा निबंधक
२. दुय्यम निबंधक मुंबई, व सह दुय्यम निबंधक मुंबई (बांद्रासह)
३. सर्व दुय्यम निबंधक श्रेणी १ व मूल्यांकन.
४. सर्व दुय्यम निबंधक श्रेणी २
५. सर्व कार्यासन अधिकारी (नों.म.नि. म.रा. पुणे)
६. सी. आर २०४८.
७. अवर सचिव, महसूल व वन विभाग (म-१ शाखा)
मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय अग्रेषित.